# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 09 April 2024

## Time: 7.10 AM to 7.20 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: ०९ एप्रिल २०२४ सकाळी ७.१० मि.

****

- लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात राज्यभरात २०४ उमेदवार;हिंगोलीत ३३, नांदेडमध्ये २३ तर परभणीत ३४ उमेदवार निवडणूक रिंगणात
- मुख्यमंत्र्यांच्या शासकीय निवासस्थानाचा राजकीय वापर झाल्याप्रकरणी अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस
- सगेसोयरे अंमलबजावणी तसंच ओबीसीतून आरक्षणाचा मनोज जरांगे पाटील यांचा पुनरुच्चार

  आणि
- आज गुढीपाडव्यानिमित्त बाजारपेठांमध्ये उत्साह

****

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठी उमेदवारी अर्ज मागे घेण्याची मुदत काल संपली. या टप्प्यात राज्यातल्या बुलडाणा, अकोला, अमरावती, वर्धा, यवतमाळ-वाशीम, हिंगोली, परभणी आणि नांदेड या आठ मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्व मतदार संघातल्या निवडणुकीचं चित्र आता स्पष्ट झालं असून, या सर्व ठिकाणी मिळून एकूण २०४ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी तथा प्रधान सचिव एस.चोक्कलिंगम यांनी ही माहिती दिली. ते काल मंत्रालयात पत्रकार परिषदेत बोलत होते. या सर्व ठिकाणी २६ एप्रिलला मतदान होणार आहे.

नांदेड मध्ये सहासष्ट पात्र उमेदवारांपैकी तब्बल त्रेचाळीस जणांनी माघार घेतल्याने तिथे तेवीस उमेदवारांमध्ये निवडणूक होईल, तर परभणी मतदारसंघात एक्केचाळीस पात्र उमेदवारांपैकी सात उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्यामुळे तिथे आता चौतीस उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

हिंगोली इथं अठ्ठेचाळीस पात्र उमेदवारांपैकी पंधरा जणांनी अर्ज मागे घेतले तेहतीस उमेदवार निवडणूक लढवतील. महायुतीच्या जागावाटपात हिंगोली लोकसभा मतदार संघ शिवसेनेला सुटल्यामुळे भाजपच्या तीन पदाधिकाऱ्यांनी अपक्ष म्हणून अर्ज दाखल केला होता. त्यापैकी रामदास पाटील आणि श्याम भारती महाराज यांनी काल अर्ज मागे घेतले. भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष शिवाजी जाधव यांनी मात्र अर्ज कायम ठेवला आहे.

बुलडाणा मतदारसंघात एकवीस उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत. अकोला मतदारसंघात पंधरा, अमरावती मतदारसंघात सदोतीस, वर्धा मतदारसंघात चोवीस, तर यवतमाळ-वाशीम मतदार संघात सतरा उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत.

परभणीमध्ये महायुतीचे उमेदवार महादेव जानकर , शिट्टी या चिन्हावर निवडणूक लढवणार असल्याची माहिती आमच्या वार्ताहरानं दिली आहे.

प्रकाश आंबेडकर यांच्या वंचित बहुजन आघाडीला प्रेशर कुकर हे निवडणूक चिन्ह मिळालं आहे .या पक्षानं गॅस सिलिंडर हे निवडणूक चिन्ह मागितलं होतं, मात्र सोडतीमध्ये हे चिन्ह त्यांना मिळालं नाही.

****

दुसऱ्या टप्प्यातल्या ८ लोकसभा मतदारसंघात एकूण १ कोटी ४९ लाख २५ हजार ९१२ मतदार आहेत. यापैकी १८ हजार ४७१ मतदार टपालाद्वारे तर १४ हजार ६१२ मतदार घरुन मतदान करणार आहेत. घरुन मतदान करणाऱ्यांमध्ये १० हजार ६७२ मतदार हे ८५ वर्षांवरचे ज्येष्ठ नागरिक असून, ३ हजार ५५५ मतदार ४० टक्क्यांहून अधिक दिव्यांग तर ३८५ नागरिक अत्यावश्यक सेवेतले मतदार आहेत.

****

देशभरात निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असून, विविध पक्षांचे प्रमुख नेते आणि प्रचारक देशाच्या विविध भागात प्रचारसभा घेत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल चंद्रपूर आणि गडचिरोली–चिमूर लोकसभा मतदारसंघासाठी चंद्रपूर इथे सभा घेतली. ही निवडणूक स्थैर्य विरूद्ध अस्थैर्य अशी असल्याचं मोदी यांनी नमूद केलं. राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार, चंद्रपूर लोकसभा मतदारसंघातून तर विद्यमान खासदार अशोक नेते हे गडचिरोली लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार आहेत. पंतप्रधान उद्या १० तारखेला नागपूर इथं प्रचारसभा घेणार आहेत.

****

मुख्यमंत्र्याचं अधिकृत शासकीय निवासस्थान असलेल्या वर्षा निवासस्थानाचा राजकीय कारणासाठी वापर झाल्यामुळे अधिकाऱ्यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. या नोटिशीला उत्तर मिळाल्यावर कारवाई होईल, अशी माहिती राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोकलिंगम यांनी दिली. याप्रकरणी तक्रार प्राप्त झाल्यामुळे मुंबई शहर जिल्हाधिकारी यांनी नोटीस बजावल्याचं त्यांनी सांगितलं.

****

लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीतल्या पक्षांमध्ये ताळमेळ नसल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते विधीज्ञ प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. ते काल अकोला इथे पत्रकार परिषदेत बोलत होते. वंचित बहुजन आघाडीनं आतापर्यंत एकोणीस जागांसाठी उमेदवार जाहीर केले आहेत, राज्यातल्या उर्वरित जागांबद्दल दोन दिवसात निर्णय जाहीर करणार असल्याचं प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी सांगितलं.

****

उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेचे नेते अमोल कीर्तिकर काल अंमलबजावणी संचालनालय–ईडी च्या कार्यालयात आठ तास चौकशी झाली. मुंबई महापालिकेतल्या कथित खिचडी घोटाळा प्रकरणात ईडीनं त्यांना गेल्या पंचवीस तारखेला समन बजावलं होतं. दरम्यान शिवसेना ठाकरे गटानं अमोल कीर्तिकर यांना लोकसभे उमेदवारी दिली आहे.

****

मराठा समाजानं लोकसभा निवडणुकीत कोणालाही उमेदवारी अथवा पाठिंबा दिलेला नाही. आरक्षणासाठी सगेसोयरे अध्यादेशाच्या अंमलबजावणी बाबतीत जो पक्ष निर्णय घेईल त्याच्या बाजूनेच मराठा समाज उभा राहील असं मराठा आरक्षण आंदोलनकर्ते मनोज जरांगेग पाटील यांनी म्हटलं आहे. ते काल नाशिक जिल्ह्याच्या सिन्नर तालुक्यातील पांगरी इथे पत्रकारांशी बोलत होते. मराठा आरक्षण हे ओबीसी मधूनच देण्याच्या मागणीवर ठाम असल्याचं जरांगे पाटील यांनी सांगितलं.

****

श्रोतेहो, लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर ‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण नांदेड लोकसभा मतदार संघाचा आढावा ऐकणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात वाजता हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

राष्ट्रीय शिक्षण संशोधन आणि प्रशिक्षण परिषद –एनसीईआरटीनं त्यांच्या शैक्षणिक साहित्यावरील स्वामित्व हक्कांबाबत निर्देश जारी केले आहेत. एखादी व्यक्ती किंवा संस्थेनं परवानगीशिवाय एनसीईआरटीची अधिकृत पाठ्यपुस्तकं व्यावसायिक वापरांसाठी प्रकाशित केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशारा परिषदेनं दिला आहे.

****

हिंदू कालगणनेनुसार नवीन वर्षाला आज चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडव्यापासून प्रारंभ होत आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल चंद्रपुरात जाहीर सभेतून जनतेला मराठीतून गुढीपाडव्याच्या शुभेच्छा दिल्या. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू तसंच राज्यपाल रमेश बैस यांनी गुढी पाडवा तसंच मराठी वर्षानिमित्त राज्यातल्या जनतेला शुभेच्छा

दिल्या आहेत. देशाच्या विविध भागात हा सण चैत्र शुक्लादी, युगादि, संसर पाडवो आणि चेटी चंड म्हणून साजरा केला जातो.
शालिवाहन शक १९४६ ला आजपासून प्रारंभ होत आहे. सम्राट शालिवाहनाची राजधानी असलेल्या तत्कालिन प्रतिष्ठान म्हणजेच सध्याच्या पैठण नगरातल्या तीर्थस्तंभ परिसरात आज विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात येतं.

छत्रपती संभाजीनगरमध्येही गुलमंडी परिसरात दरवर्षी गुढी उभारण्यात येते. आज सकाळी ९ वाजता शिवसेना नेते चंद्रकांत खैरे यांच्या हस्ते गुढीपूजन होणार आहे.

दरम्यान, गुढीपाडव्यासाठी बाजारपेठा सजल्या आहेत. गुढी उभारण्यासाठी लागणाऱ्या बांबूच्या काठ्या आणि साखरगाठ्यांसह पूजा साहित्याची दुकानं ग्राहकांच्या गर्दीनं फुलून गेली आहेत. गुढी पाडवा हा साडे तीन शुभ मुहूर्तांपैकी एक महत्त्वाचा मुहूर्त मानला जातो, या मुहूर्तावर इलेक्ट्रॉनिक वस्तू, वाहनं तसंच वस्त्र आभुषणांसह गृहसाहित्यानं बाजारपेठा सजल्याचं दिसून येत आहे.

****

रमझान ईद आणि डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त खरेदी करण्यासाठी परभणीतही बाजारपेठेत गर्दी होत आहे. प्रामुख्याने कपडे, ज्वेलरी, अत्तर तसंच सुक्यामेव्याच्या दुकानामध्ये गर्दी होत असल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे. उद्या सायंकाळी चंद्रदर्शनानंतर परवा रमजान ईद साजरी होण्याची शक्यता आहे.

****

धाराशिव शहरात शिवप्रतिष्ठानच्यावतीने काल छत्रपती संभाजी महाराज यांचा बलिदान दिनाच्या निमित्त शहरातील शेकडो तरुणांनी संभाजी महाराजांना आदरांजली अर्पण केली.

****

छत्रपती संभाजीनगर लोकसभा मतदारसंघात 'गुढी पाडवा- मतदान वाढवा' हा मतदार जनजागृती उपक्रम जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी दिलीप स्वामी यांच्या संकल्पनेतून राबवण्यात येत आहे. या अंतर्गत काल बजाजनगर इथल्या हायटेक इन्स्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी इथे विद्यार्थ्यांनी लोककलांच्या

माध्यमातून मतदानाविषयी जागृती केली. जिल्हाधिकारी कार्यालयातल्या सगळ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही, लोकशाहीची गुढी उंच उभारण्यासाठी जनसहभाग वाढवण्याचा संकल्प करू या, असा निर्धार केला.

****

लातूर इथं काल 'माझा एक दिवस मतदार जागृतीसाठी' हा उपक्रम घेण्यात आला. जिल्ह्यात ग्रामीण आणि शहरी भागात एकाच वेळी मतदार जागृती फेरी काढण्यात आली. या माध्यमातून जवळपास अडीच लाख कुटुंबांपर्यंत मतदार जागृतीचा संदेश पोहचवण्यात आला.

****

जालना जिल्ह्यातल्या शहरी आणि ग्रामीण भागात काल शालेय विद्यार्थ्यांची मतदान जनजागृती फेरीत काढण्यात आली. या फेरीत सहभागी विद्यार्थ्यांनी नागरिकांना मतदान करण्याचं आवाहन केलं.

****

बीड इथं काल संस्कार विद्यालय परिसरात रांगोळी स्पर्धा घेण्यात आली. यावेळी ४३ वेगवेगळ्या पद्धतीनं मतदानाचं महत्त्व सांगणाऱ्या रांगोळ्या रेखाटण्यात आल्या.

****